14 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'राजकीय चळवळी व नेतृत्व'मध्ये संशोधनाचे बीज

## डॉ. जयसिंगराव पवार; डॉ. अरुण भोसले यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : डॉ. अरुण भोसले यांनी लिहिलेल्या 'दक्षिण महाराष्ट्र राजकीय चळवळी व नेतृत्व' या पुस्तकातील प्रत्येक लेख हा संशोधनाचे बीज आहे,

सामाजिक, राजकीय चळवळीत योगदान देणाऱ्या थोर व्यक्तींचे कर्तृत्वचित्रे या पुस्तकात आहेत. त्या प्रत्येक व्यक्तीच्या कार्यावर नव्या पिढीतील संशोधकांना संशोधनासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल, त्यातून सामाजिक चळवळींच्या संशोधनाचा वटवृक्ष निर्माण होईल.' असे मत ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी आज येथे व्यक्त केले.



**कोल्हापूर : 'दक्षिण महाराष्ट्र राजकीय चळवळी व नेतृत्व' या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. जयसिंगराव पवार. शेजारी श्री. भोसले, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. रमेश जाधव, डॉ. रणधीर शिंदे आदी.**

प्रा. डॉ. भोसले यांनी लिहिलेल्या 'दक्षिण महाराष्ट्र : राजकीय चळवळ व नेतृत्व' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. रणधीर शिंदे यांनी पुस्तकाचा परिचय दिला. ते म्हणाले, 'डॉ. भोसले यांनी लिहिलेल्या पुस्तकात दक्षिण महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक चळवळीत योगदान देणाऱ्या थोर व्यक्तींच्या कार्याचा ऊहापोह केला आहे. अनेक सामाजिक राजकीय व्यक्तिमत्त्वाच्या कार्यावर आधारित एकूण १७ लेख आहेत.

डॉ. भोसले म्हणाले, 'कोरोनाकाळात या पुस्तकाच्या लेखनाबाबत विचार मंथन केलेले २० व्या शतकातील दक्षिण भारतात झालेल्या चळवळी किंवा राष्ट्रीय चळवळीशी येथील चळवळीशी असलेले नाते त्यातील सहभागी व्यक्ती त्यांचे नेतृत्वगुण अशा अंगाने माहिती संकलीत करून हे पुस्तक लिहिले आहे. यात नाना पाटील यांचा क्रांतिकारक उठाव प्रजा परिषद, रयत शिक्षण संस्थेची जडण घडण, चले जाव आंदोलन यासह अन्य सामाजिक लढ्यांचे संर्दभ घेऊन हे पुस्तक आकाराला आले आहे.

प्रा. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव, भरतभूषण माळी, डायमंड प्रकाशन संस्थेचे दत्तात्रय पास्ते आदी उपस्थित होते.

पुढारी



**कोल्हापूर : डॉ. अरुण भोसले यांच्या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व डॉ. जयसिंगराव पवार यांच्याहस्ते झाले. यावेळी उपस्थित डावीकडून डॉ. अवनीश पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. भरतभूषण माळी, दत्तात्रय पाष्टे. (छाया : नाज ट्रेनर)**

# दक्षिण महाराष्ट्राची सांस्कृतिक, साहित्यिक ओळख समोर यावी

## डॉ. जयसिंगराव पवार : डॉ. अरुण भोसलेंच्या पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दक्षिण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, साहित्यिक परंपरेची ओळख समोर येण्यासाठी भावी संशोधकांनी पुढे यावे, असे आवाहन इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे माजी प्रमुख डॉ. अरुण भोसले लिखित 'दक्षिण महाराष्ट्र : राजकीय चळवळ व नेत्वत्व' या पुस्तकाचे प्रकाशन रविवारी राजर्षी शाहू स्मारक भवन येथे झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. यावेळी डॉ. भरतभूषण माळी, दत्तात्रय पाष्टे, इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव आदींची उपस्थिती होती.

शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी पुस्तक परिचय करून दिला. यावेळी लेखक डॉ. भोसले यांनी मनोगत व्यक्त केले.

1 4 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉलेज ऑफ फार्मसीत 'इनोव्हेशन'वर कार्यशाळा

मोरेवाडी, ता. १३ : भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी येथे शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत फार्मसी महाविद्यालयातील शिक्षकांसाठी 'इनोव्हेशन ॲण्ड इनक्यूबेशन इन ॲकॅडीमिया' यावर कार्यशाळा झाली. शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा, डॉ. एन. आर. जाधव उपस्थित होते.

प्रा. डॉ. पाटील म्हणाले, ''संशोधन करताना नवीन संकल्पना आत्मसात करून त्या प्रत्यक्षात उतरण्यासाठी त्या संकल्पनेचे पृथकरण करून नवीन प्रॉडक्ट, त्यांचे बाजारामध्ये मागणी तसा पुरवठ्याची स्थितीची चाचणी महत्त्वाची असते. शिक्षकांनी इनोव्हेशन, इन्कुबेशन, स्टार्टअप संबधी आपले ज्ञान अद्ययावत करावे.' प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले, 'संशोधन समाजासाठी उपयोगी असले पाहिजे.'



मोरेवाडी : 'कॉलेज ऑफ फार्मसी'च्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, सचिन कुंभोजे, विशाल दड्डीकर, जयंत पवार, प्रिया पाटील, सूर्यकांत दोडमिसे उपस्थित होते. डॉ. एन. आर. जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. डी. ए. भागवत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर. एस. बगली यांनी आभार मानले. डॉ. एस. जी. किल्लेदार, डॉ. एस. ए. पिशवीकर, डॉ. आर. एस. बगली, डॉ. पी. जे. शिरोटे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटीया उपस्थित होते.

14 MAR 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : पुरुषोत्तम करंडक स्पर्धेतील विजेत्यांना अभितेने सतीश सलागरे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

# ‘पुरुषोत्तम’चे पारितोषिक वितरण

## छत्रपती शिवाजी महाविद्यालय सांघिक करंडकचे मानकरी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : महाराष्ट्रीय कलोपासक (पुणे), गायन समाज देवल क्लब आणि संगीत व नाट्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या ‘बारा किमी’या एकांकिकेला प्रायोगिक एकांकिका करंडक मिळाला. इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम कॉलेजच्या ‘म्हातारा पाऊस’ या एकांकिकेला पहिला, भारती विद्यापीठाचे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ‘अंदाजपंचे’ला दुसरा, तर शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या ‘श्री श्री १०८ दगड’ या एकांकिकेला तिसरा क्रमांक मिळाला. पुण्याच्या ५१ संघांची प्राथमिक, तसेच निवडक ९ संघांची अंतिम फेरी अशा दोन टप्प्यांत ही स्पर्धा झाली. उज्ज्वला खांडेकर, डॉ. राजश्री खटावकर, श्रीधर विसाळ यांनी परीक्षण केले. अभिनेता सतीश सलागरे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. यावेळी देवल क्लबचे सचिन पुरोहित, उमा नामजोशी, सुबोध गद्रे, महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेचे अध्यक्ष अनंत निघोजकर, विश्वस्त योगेश जाधव, आशिष शेट्टी, संदीप जोशी, संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या डॉ. अंजली निगवेकर, डॉ. विनोद ठाकूरदेसाई आदी उपस्थित होते.

### वैयक्तिक पारितोषिके

विद्यार्थी दिग्दर्शक (म्हातारा पाऊस- सुधाकर ढोकळे), विद्यार्थी लेखक (संग्राम देसाई, गोमांतक?, डीआरके कॉलेज), वाचिक अभिनय (म्हातारा पाऊस, समीक्षा संकपाळ), अभिनय नैपुण्य (म्हातारा पाऊस, महेश गवंडी), अभिनेता (पार्थ घोरपडे, श्री श्री श्री १०८ दगड), अभिनेत्री (सृष्टी सलागरे, इटस् हॅप्पन, डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय).

1 4 MAR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुरूषोत्तम करंडकमध्ये 'म्हातारा पाऊस' प्रथम

## प्रथम क्रमांकाच्या इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अॅन्ड कॉमर्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केला जलोष

प्रतिनिधी
कोल्हापूर

पुरूषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स कॉलेजच्या 'म्हातारा पाऊस' या एकांकिकेसाठी सांघिक गटातील प्रथम पारितोषिक पटकावले. कोल्हापूर भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'अंदाजपंचे' या एकांकिकेने द्वितीय तर शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या 'श्री श्री १०८ दगड' या एकांकिकेला सांघिक विभागातील तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या संघांना अभिनेते सतीश सलागरे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.



कोल्हापूर : पुरूषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांसोबत अभिनेते सतीश सलागरे. सोबत अनंत निघोजकर, योगेश जादाव, आशिष शेट्टी, संदीप जोशी, सचिन पुरोहित, उमा नामजोशी, सुबोध गद्रे, डॉ. अंजली निगवेकर, डॉ. विनोद ठाकूर-देसाई आदी.

- भारती विद्यापीठाच्या 'अंदाजपंचे' व्दितीय तर शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या 'श्री श्री १०८ दगड' एकांकिकेला तृतीय क्रमांक

कोल्हापूर पुरूषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. पुणे येथील महाराष्ट्रीय कलोपासक, शिवाजी विद्यापीठ नाट्यशास्त्र विभाग व गायन समाज देवल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ते १३ मार्च या कालावधीत विद्यापीठातील भाषा भवन येथे ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत १४ संघांनी सहभाग नोंदवला होता.

सातारा येथीलछत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या '१२ किमी' ही एकांकिका सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली. शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या 'श्री श्री १०८ दगड' पार्थ घोरपडे याला उत्कृष्ट अभिनेता म्हणून गौरवण्यात आले. डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजमधील 'इटथापन्स' या एकांकिकेतील भूमिकेसाठी सृष्टी सलागरे हिला उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून गौरवण्यात आले. सर्वोत्कृष्ट लेखक कोल्हापुरातील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या 'गोमांतक?' या एकांकिकेच्या लेखनासाठी संग्राम देसाई याला मिळाले. सर्वोत्कृष्ट विद्यार्थी दिग्दर्शक दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स कॉलेजच्या 'म्हातारा पाऊस' सुधाकर ठोकळे याला पारितोषिक मिळाले. सर्वोत्कृष्ठ वाचिक अभिनयासाठी दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स कॉलेजच्या 'म्हातारा पाऊस' समिक्षा संकपाळ हे विशेष बक्षीस देण्यात आले.

परीक्षक उज्ज्वल्ला खांडेकर, राजश्री खटावकर, श्रीधर विसाळ यांनी काम पाहिले. यावेळी आनंत निघोजकर, योगेश जाधव, अशिष शेट्टी, संदीप जोशी, उमा नामजोशी, सचिन पुरोहित, सुबोध गद्रे, डॉ. अंजली निगवेकर, विनोद ठाकूर-देसाई, अनुपम दाभाडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 MAR 2022 लोकमत

# दत्ताजीराव कदम कॉलेजला विजेतेपद

## पुरुषोत्तम करंडक : भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाला उपविजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर** : इचलकरंजीतील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेजने पुरूषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या सांघिक विजेतेपदावर रविवारी नाव कोरले. या महाविद्यालयाने 'म्हातारा पाऊस' ही एकांकिका सादर केली. 'अंदाजपंचे' एकांकिका सादर करणाऱ्या भारती विद्यापीठाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने उपविजेतेपद पटकावले. शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाच्या 'श्री श्री १०८ दगड' या एकांकिकेने तृतीय क्रमांक मिळवला.

पुणे येथील महाराष्ट्रीय कलोपासक, शिवाजी विद्यापीठ नाट्यशास्त्र विभाग व गायन समाज देवल क्लब यांच्यातर्फे दि. ११ ते १३ मार्च दरम्यान विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनात ही स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये १४ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेचा निकाल रविवारी जाहीर झाला. त्यातील विजेत्या संघांना अभिनेते सतीश सलागरे यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी अनंत निघोजकर, योगेश जाधव, आशिष शेट्टी, संदीप जोशी, उमा नामजोशी, सचिन पुरोहित, सुबोध गद्रे, डॉ. अंजली निगवेकर, विनोद ठाकूरदेसाई, अनुपम दामाडे उपस्थित होते. उज्ज्वल खांडेकर, राजश्री खटावकर, श्रीधर विसाळ यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.



**कोल्हापुरात रविवारी इचलकरंजीतील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेजने पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या सांघिक विजेतेपदावर नाव कोरले. या संघाला अभिनेते सतीश सलागरे यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी अनंत निघोजकर, योगेश जादाव, आशिष शेट्टी, संदीप जोशी, सचिन पुरोहित, उमा नामजोशी, सुबोध गद्रे, अंजली निगवेकर, विनोद ठाकूरदेसाई, आदी उपस्थित होते.**

### पार्थ घोरपडे, सृष्टी सलागरे ठरली उत्कृष्ट

सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची 'बारा किलोमीटर' ही एकांकिका सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली. शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाचा पार्थ घोरपडे (उत्कृष्ट अभिनेता), डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजमधील सृष्टी सलागरे (उत्कृष्ट अभिनेत्री), डीआरके कॉलेजचा संग्राम देसाई (सर्वोत्कृष्ट लेखक), दत्ताजीराव कदम कॉलेजचा सुधाकर ठोकळे (सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक), समीक्षा संकपाळ ( सर्वोत्कृष्ठ वाचिक अभिनय) यांना गौरविण्यात आले.

पुढारी

# 'पुढारी'कार डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाला तीन कोटींचा निधी

शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाला १ कोटी रुपये द्यावेत, असे राजेश क्षीरसागर यांनी सूचविले. मात्र, राज्य सरकारने तीन कोटींचा निधी जाहीर केला आहे. अर्थसंकल्पात विद्यापीठास १० कोटी रुपये मंजूर केले असल्याचे मंत्री सामंत म्हणाले.

सकाळ

# प्राचार्या डॉ. जुगळे व्यवस्थापन परिषदेवर



योजना जुगळे

**कबनूर :** हातकणंगले येथील अण्णासाहेब डांगे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. योजना वसंतराव जुगळे (सांगली) यांची प्राचार्य प्रवर्गातून शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यपदी बिनविरोध निवड झाली. निवडीचे पत्र कुलगुरू डॉ.व्ही. एन. शिर्के यांनी त्यांना दिले. या वेळी प्रकुलगुरू डॉ.पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

सकाळ

# 'संशोधन वृत्तीला चालना द्यावी'

सकाळ वृत्तसेवा

गारगोटी, ता. १३ : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक व चिकित्सक दृष्टिकोन आत्मसात करून संशोधन वृत्तीला चालना द्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे यांनी केले.

येथील डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलात डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ व भारतीय राष्ट्रीय युवा विज्ञान अकादमी यांच्या दोन दिवसीय विज्ञान शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे प्रमुख उपस्थित होते.

संस्था प्रतिनिधी विजयराव घोलपे यांनी प्रास्ताविक केले. मेंगाणे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. जयवंत गुंजकर, विवेक पारकर व संशोधक विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबविले. संजय जाधव, सचिव श्रीपाद धरणगुत्ती, मुख्याध्यापक मिलिंद पांगिरेकर, के. ए. देसाई, डी. डी. देवाळे, एन. जी. कांबळे, शिवाजीराव वळिवडेकर आदी उपस्थित होते. डी. जी. कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. एस. डी. देसाई यांनी आभार मानले.